

# इवलेसे रोप...

TATA MUTUAL FUND

## टाटा स्मॉल कॅप फंड

**१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या वर्षभराच्या काळात निफ्टी स्मॉल कॅप निर्देशांकात जवळ जवळ १० टक्के घसरण झाली. या दरम्यान स्मॉल कॅप म्युच्युअल फंडांचा सरासरी परतावा -५ टक्के होता. या घसरणीची ज्या स्मॉल कॅप फंडांना कमी झळ लागली, त्यात टाटा स्मॉल कॅप फंडाचा समावेश आहे. टाटा स्मॉल कॅप फंडाने बाजार अतिशय कठीण परिस्थितीतून संक्रमण करत असतांना फंड गटातील अन्य फंडांच्या तुलनेत चांगली कामगिरी केली आहे.**



**वसंत कुलकर्णी**
vasant@vasantkulkarni.com

टाटा स्मॉल कॅप फंडाची सुरुवात दोन नोव्हेंबर २०१८ रोजी झाली. दोन नोव्हेंबर २०१८ ते १५ मे २०२३ दरम्यान या फंडाने २२.५६ टक्के परतावा दिला आहे. या फंडाची आजपर्यंतची दीर्घकालीन कामगिरी उत्कृष्ट म्हणावी लागेल. स्मॉल कॅप फंडांनी ३ वर्षे आणि ५ वर्षे कालावधीत उत्तम परतावा दिला असला तरी निर्देशांकाने चांगला परतावा दिलेला नाही. निफ्टी स्मॉल कॅप २५० टीआरआयचे १६ ते १७ पट मूल्यांकन पाहता सध्याचा काळ स्मॉल कॅप गुंतवणुकीसाठी एक चांगला काळ असू शकेल.

स्मॉल कॅप हे अतिशय अस्थिर असतात. स्मॉल कॅप कंपन्यांतून (फंडातून) मोठा परतावा मिळविणे हे तुम्ही कोणत्या प्रकारचे गुंतवणूकदार आहात, यावर अवलंबून असेल. तुम्ही अधिक जोखीम घेऊ इच्छित असाल आणि तुमची सहनशीलता आणि गुंतवणुकीचा कालावधी दीर्घ असेल, तर स्मॉल कॅप कंपन्या (फंड) दीर्घ कालावधीत लार्ज कॅपपेक्षा जास्त परतावा देऊ शकतात. दीर्घकालीन (१० वर्षे आणि त्याहून अधिक) कालावधीत विनाखंड 'एसआयपी' करू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांनी टाटा स्मॉल कॅप फंडांचा विचार करायला हरकत नाही. हा फंड या फंड गटातील सर्वोत्कृष्ट फंड आहे, असा दावा नसला तरी फंडाच्या स्थापनेपासून सातत्याने कामगिरी करत असलेला हा फंड आहे. स्मॉल कॅप फंड असूनही, फंडाने जोखीम उत्कृष्ठरित्या सांभाळताना पोर्टफोलिओचे मंथन चाणाक्षपणे हाताळले आहे. टाटा स्मॉल कॅप फंड दोन नोव्हेंबर २०१८ रोजी अस्तित्वात आला. या फंडांची ३० एप्रिल २०२३ रोजी मालमत्ता रु. ३८४१.१३ कोटी होती.

'सेबी'च्या आदेशानुसार, स्मॉल कॅप फंडांनी त्यांच्या मालमत्तेपैकी किमान ६५ टक्के मालमत्ता स्मॉल कॅप समभागांमध्ये गुंतवणे आवश्यक आहे. 'सेबी'च्या मार्केट कॅपनुसार पहिल्या २५० कंपन्या वगळून उर्वरित कंपन्या स्मॉल कॅप गटात मोडतात.



## अनुभवी निधी व्यवस्थापक



चंद्रप्रकाश पडियार

चंद्रप्रकाश पडियार हे या फंडाचे निधी व्यवस्थापक आहेत. ते टाटा ॲसेट मॅनेजमेंट प्रा. लि.मध्ये सप्टेंबर २०१८ पासून वरिष्ठ निधी व्यवस्थापक (इक्विटी) म्हणून कार्यरत आहेत. पडियार यांनी पूर्वी अल्केमी कॅपिटल मॅनेजमेंट प्रा. लि.सोबत ऑनशोर लाँग-ओन्ली स्ट्रॅटेजीजसाठी पोर्टफोलिओ मॅनेजर म्हणून काम केले आहे. त्यांना संशोधन आणि निधी व्यवस्थापनाचा २१ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात युटीआय म्युच्युअल फंड येथे समभाग संशोधक आणि विश्लेषक म्हणून केली. कालांतराने त्यांची विविध फंडांचे निधी व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली गेली. पडियार यांनी पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटमधून व्यवस्थापनाची पदव्युत्तर पदवी घेतली आहे. त्यांनी अमेरिकेच्या सीएफए इन्स्टिट्यूटमधून सीएफएच्या सर्व तीन पातळ्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत.

दोन नोव्हेंबर २०१८ ते १५ मे २०२३ दरम्यान फंडाची आणि बेंचमार्क कामगिरी तपासल्यास आणि त्यातही या कालावधीतील तीन वर्षांची चलत सरासरी (रोलिंग रिटर्न्स) असे दर्शविते, की या फंडाने १०० टक्के बेंचमार्क निर्देशांकापेक्षा सरस कामगिरी केली आहे. वेगवेगळ्या कालखंडात आणि बाजारातील परिस्थितींमध्ये गुंतवणूकदारांना सातत्याने 'अल्फा' मिळवून देण्यात निधी व्यवस्थापक यशस्वी ठरले आहेत. या फंडाने तीन वर्षांत ४६.५३ टक्के वृद्धी दिलेली आहे. फंडाने मागील तीन वर्षांत २३.३४ टक्के वार्षिक परतावा दिला आहे. तीन वर्षांच्या परताव्यावर आधारित क्रमवारीत हा टाटा स्मॉल कॅप फंड चौथ्या क्रमांकावर आहे. या कालावधीत ६० टक्के वेळा फंडाने २० टक्क्यांपेक्षा अधिक परतावा दिला आहे.

**(सोबतचा आलेख पाहा)**

गुंतवणुकीसाठी कंपन्यांची निवड ही वृद्धिक्षम कंपन्या आणि योग्य गुंतवणूकमूल्य असलेल्या कंपन्यांतून केली जाते. निधी व्यवस्थापक बॉटम-अप पद्धतीचा अवलंब करतात. फंड प्रामुख्याने ६५ टक्के गुंतवणूक स्मॉल कॅप समभागांमध्ये करतो, तर उर्वरित ३५ टक्के पोर्टफोलिओमध्ये प्रामुख्याने मिड कॅप समभागांचा समावेश आहे. फंडाच्या पोर्टफोलिओत कमी प्रमाणात लार्ज कॅप कंपन्या आहेत. सोबतच्या आलेखात टाटा स्मॉल कॅप फंड पोर्टफोलिओचे शीर्ष समभाग आणि क्षेत्रे दर्शविली आहेत. एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावाधीत निफ्टी स्मॉल कॅप इंडेक्स १३ टक्के घसरला आणि स्मॉल कॅप म्युच्युअल फंडांचा सरासरी वार्षिक परतावा -४ टक्के होता. याच कालावधीत टाटा स्मॉल कॅप फंडाने गुंतवणूकदारांच्या मुद्दलाला फारशी बाधा पोहोचू दिली नाही; पण सकारात्मक परतावा दिला. स्मॉल कॅप फंडासाठी अतिशय कठीण परिस्थितीत ज्या फंडांनी तुलनेने चांगली कामगिरी केली, त्या फंडात टाटा स्मॉल कॅप फंडांचा समावेश आहे.

## टाटा स्मॉल कॅप फंडाची कामगिरी







'सकाळ मनी'च्या वाचकांना माहित आहे, की या सदरासाठी निवड फंडाच्या दीर्घकालीन कामगिरीच्या आधारे केली जाते. कामगिरीतील सातत्य हा एक महत्त्वाचा निकष आहे. वेगवेगळ्या कालावधीतील अव्वल रोलिंग रिटर्न्स असणारे फंड सातत्यपूर्ण कामगिरी करणारे फंड म्हणून ओळखतात. याच निकषावर टाटा स्मॉल कॅप फंड हा सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या स्मॉल कॅप फंडांच्या यादीत असलेला फंड आहे. म्हणून या फंडाची गुंतवणुकीसाठी शिफारस केली आहे.

**(लेखक ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार आहेत.**
**९७०२४९०९००)**

# स्मॉल कॅप कंपन्यांसाठी आगामी काळ बहराचा



चंद्रप्रकाश पडियार



जगभरात 'चायना प्लस वन' हा विचार जोर धरत आहे आणि त्याचवेळी सरकार 'मेक इन इंडिया'वर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे स्मॉल कॅप कंपन्यांसाठी आगामी काळ बहराचा असेल, असे वाटते. जर तुम्ही योग्य फंडाची निवड केली असेल, तर स्मॉल कॅप फंडासाठी ही एक चांगली गुंतवणूकसंधी असेल... सांगत आहेत टाटा स्मॉल कॅप फंडाचे निधी व्यवस्थापक चंद्रप्रकाश पडियार. ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार वसंत कुलकर्णी यांनी खास 'सकाळ मनी'साठी घेतलेली त्यांची मुलाखत.

**प्रश्न : सध्याचे मूल्यांकन स्मॉल कॅप फंडात गुंतवणुकीस योग्य वाटते का?**

**पडियार :** स्मॉल कॅपमध्ये एक मुद्दा आहे जो प्रत्येकाने लक्षात घेतला पाहिजे, तो म्हणजे कंपन्यांच्या मूल्यांकनाबाबत सरसकट विचार करण्याऐवजी कंपनीसापेक्ष विचार करणे महत्त्वाचे आहे. सामान्यपणे मी असे विधान करू इच्छितो, की आम्हाला असे वाटते, की मूल्यांकन नव्याने गुंतवणूक करण्यास अत्यंत वाजवी आहे. आम्ही व्यवस्थापित करत असलेल्या स्मॉल कॅप फंडाच्या गुंतवणुकीत आम्ही अशा कंपन्यांची निवड केली आहे.

**प्रश्नः टाटा स्मॉल कॅप फंडाच्या गुंतवणुकीत असलेल्या काही सेक्टरबद्दल आपली विशिष्ट मते आहेत का?**

**पडियार :** आमच्या गुंतवणुकीत अनेक सेक्टर आणि कंपन्या असल्या तरी काही क्षेत्रे अशी आहेत, जिथे मूल्यांकन वाजवी नाही. उत्पादन क्षेत्रात अभियांत्रिकी, भांडवली वस्तू, वाहन आणि वाहनपूरक उद्योग मूल्यवर्धित पोलाद अशी काही क्षेत्रे आहेत, जिथे आम्हाला संधी दिसत आहे. या क्षेत्रांमध्ये भारतीय उत्पादक जगभरातील बाजारपेठ मिळवत आहेत. जेव्हा मॅन्युफॅक्चरिंग वेग घेते, तेव्हा लॉजिस्टिकसाठी 'अच्छे दिन' येतात. समर्पित फ्रेट कॉरिडॉरदेखील कार्यान्वीत होत आहे आणि यामुळे लॉजिस्टिकसाठी उज्ज्वल भवितव्य आहे, असे वाटते.

**प्रश्नः तुमच्या मते गुंतवणूकदाराने स्मॉल कॅप गुंतवणूक किती प्रमाणात करावी?**

**पडियार :** या प्रश्नाचे उत्तर व्यक्तीसापेक्ष बदलू शकते. कारण प्रत्येकाचा जोखिमांक वेगळा असतो. ती व्यक्ती जीवनाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, यावरदेखील अवलंबून असते. आपण आर्थिक चक्राच्या कोणत्या टप्प्यात आहोत, हे आपल्याला पाहावे लागेल.





मागे पाहिले तर जेव्हा जेव्हा कंपन्या कर्ज घेण्यास उत्सुक असतात, बँकांच्या कर्जवाटपात वाढ होते, तेव्हा तेव्हा याचा अप्रत्यक्ष फायदा स्मॉल कॅप कंपन्यांना होतो आणि त्या स्मॉल कॅप बाजारात अधिक चांगली कामगिरी करतात. कारण या लहान कंपन्या मोठ्या कंपन्यांवर अवलंबून असतात. पण, कंपन्यांनी जास्त फायदा घेतल्याने, मंदीच्या क्षणी, व्यवसायांना फटका बसू लागतो. जगभरात 'चायना प्लस वन' हा विचार जोर धरत आहे आणि त्याचवेळी सरकार 'मेक इन इंडिया'वर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करीत आहे. आम्हाला वाटते, की स्मॉल कॅप कंपन्यांसाठी आगामी काळ बहराचा असेल. जर तुम्ही योग्य फंडाची निवड केली असेल, तर स्मॉल कॅप फंडासाठी ही एक चांगली गुंतवणूकसंधी असेल.

**प्रश्नः या वर्षी अनेक स्मॉल कॅप कंपन्या मोठ्या संख्येने सूचीबद्ध होतील, असे तुम्हाला वाटते का?**

**पडियार :** कोविडपश्चात जे 'आयपीओ' आले होते, त्यापैकी बहुतेकांचे मूल्यांकन वाजवी मूल्यांकनापेक्षा खूप जास्त होते आणि त्यामुळेच गुंतवणूकदारांनी या गुंतवणुकीतून जास्त पैसे कमावले नाहीत. भारतातील मर्चंट बँकर्सशी वेळोवेळी बोलत असतो. आम्हाला तेव्हा असे जाणवले, की सूचिबद्ध होऊ इच्छिणाऱ्या कंपन्यांची यादी खूप मोठी होती. प्रवर्तक आकर्षक मूल्यांकनावर सूचीबद्ध होण्याचा प्रयत्न करीत होते. सूचिबद्ध होऊ इच्छिणाऱ्या बऱ्याच कंपन्यांत पीई कंपन्यांनी गुंतवणूक केली आहे आणि त्यापैकी बहुतेकांना त्यांच्या गुंतवणुकीतून बाहेर पडायचे होते. त्यांना अपेक्षित नफा मिळत नव्हता. या गोष्टीतून प्रवर्तक आणि आयपीओ गुंतवणूकदार हे खूप काही शिकले असतील, असे वाटते. मूल्यांकन इतकेसुद्धा चढे नसावे, की आयपीओ गुंतवणूकदार त्यातून नफा मिळवू शकणार नाहीत. अशा नव्याने सूचिबद्धतेचा विचार करणाऱ्या कंपन्या वाजवी किमतीत 'आयपीओ'तून विक्री करतील, अशी आशा वाटते.

**प्रश्नः रिझर्व्ह बँकेने मागील वर्षभरात अडीच टक्क्यांची व्याजदरवाढ केली आहे. स्मॉल कॅप कंपन्यांवर या व्याजदरवाढीचा कसा परिणाम होईल, असे तुम्हाला वाटते?**

**पडियार :** आज बहुतेक स्मॉल कॅप कंपन्यांचा भांडवलीविस्तार हा त्यांच्या स्वतःच्या गंगाजळीतून होत आहे. केवळ खेळत्या भांडवलासाठी बँकेचे कर्ज घेतले जात आहे. लॉकडाउननंतर, बहुतेक कंपन्या त्यांचे ताळेबंद कर्जफेड करून संकुचित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विकसित अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतातील व्याजदरात कमी वाढ झाली आहे आणि व्याजदर जरी वाढले, तरी कंपन्यांवर मोठा परिणाम होणार नाही. त्यामुळे आम्ही निवडलेल्या कंपन्यांवर व्याजदरवाढीचा खूप परिणाम होईल, असे वाटत नाही.

**प्रश्नः येत्या वर्षात तुम्हाला स्मॉल कॅपची कामगिरी कशी असेल, असे वाटते?**

**पडियार :** सध्या आपण मूल्यांकनाच्या बाबतीत कोविडपूर्व पातळीवर आहोत. अनेक कंपन्या त्यांच्या कोविडपूर्व वृद्धिदराच्या खाली आहेत. याचा अर्थ कंपन्या निवडताना अत्यंत काटेकोर निकष लावणे आवश्यक आहे. येत्या तिमाहीत बाजारात अस्थिरता वाढेल. परंतु, त्यानंतर कंपन्यांच्या उत्सर्जनात वाढ झालेली दिसेल. जर आपण वर्ष २०२४ साठी किंमत ते कमाईचे गुणोत्तर पाहिले, तर आपल्याला ते १८ च्या आसपास दिसते आणि २०२५ च्या अपेक्षित नफ्याच्या सुमारे १५ पट दिसत आहे.

**प्रश्नः तुमच्या स्मॉल कॅप पोर्टफोलिओत अन्य फंडांच्या तुलनेत कमी कंपन्या आहेत. स्मॉल कॅपसाठी अतिवैविध्य टाळावे, असे तुम्हाला वाटते का?**

**पडियार :** आम्ही वाजवी किमतीत गुंतवणूक करणारे आहोत (ग्रोथ अॅट रिझनेबल व्हॅल्यू). याचा अर्थ आम्हाला योग्य मूल्यमापनात चांगली गुणवत्ता हवी आहे. म्हणूनच आम्ही कंपन्यांची संख्या मर्यादित ठेवली आहे. आमच्या फंडात फक्त ४७ कंपन्या असण्याचे हे कारण आहे.

*(डिस्क्लेमर : म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखमीच्या अधीन असते. त्यामुळे गुंतवणूक करण्यापूर्वी योजनेशी संबंधित सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचावीत, तसेच यासाठी आपल्या तज्ज्ञ सल्लागाराची मदत घेणे हिताचे असते.)*

विकसित अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतातील व्याजदरात कमी वाढ झाली आहे आणि व्याजदर जरी वाढले, तरी कंपन्यांवर मोठा परिणाम होणार नाही. त्यामुळे आम्ही निवडलेल्या कंपन्यांवर व्याजदरवाढीचा खूप परिणाम होईल, असे वाटत नाही.

- चंद्रप्रकाश पडियार,
निधी व्यवस्थापक, टाटा स्मॉल कॅप फंड

